REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
UGC APPROVED JOURNAL NO. 48514
VOLUME - 8 | ISSUE - 9 | JUNE - 2019

# ऋग्वेदलीन अश्व : एक अभ्यास

प्रा. गोवर्धन कृष्णाहरी दिकोंडा
सहाय्यक प्राध्यापक, इतिहास विभाग, कला व वाणिज्य महाविद्यालय, माढा ता. माढा, जि. सोलापूर.

**गोषवारा :**



प्राचीन काळापासून अश्वाचा उपयोग रथासाठी, प्रवासाठी, युद्धासाठी, शर्यतीसाठी आणि धार्मिक यज्ञासाठी केल्याचे उल्लेख प्राप्त होतात. मानवाच्या जीवनात अश्वाचा प्रवेश नवाश्मयुगापसून झाल्याचे दिसून येते अश्वाच्या अगोदरच कुत्रा, शेळी, मेंढी, गाय हे प्राणी मानवाच्या जीवनात प्रवेश केल्याने त्यांना पाळीव प्राण्याचा दर्जा मिळाला तसेच अश्वालाही पाळीव प्राण्याचा दर्जा प्राप्त झाला. ऋग्वेदकाळापासून अश्व हा युद्ध, वाहन तथा प्रवासाठी उपयुक्त असल्याचे पुरावे मिळतात. ऋग्वेदकाळी अश्व पाळीव असल्याने त्यांना हवे तसे पालन करून विक्रीस उपलब्ध केले जात होते. ऋग्वेदात कित्येक ठिकाणी घोडदौडीचेही उल्लेख आढळतात. अश्वांची पागा, त्यांचा खुराक, त्यांचे स्नान इत्यादीची व्यवस्था पाहण्यासाठी अश्वपाल नेमीत असत. अश्वांचे लगाम व चाबुक इत्यादी उपकरणांचे वर्णन ऋग्वेदात आढळते.

**महत्त्वाचे शब्द :** अश्व, अश्विनौ, अश्वपाल, आजि, सोमयाग यज्ञ, वडवा, नासत्य, दस्त्र

प्राचीन काळापासून अश्व तथा घोडा या पाळीव प्राण्याचा उपयोग अनेकांगी करण्यात आला. अश्वाचा उपयोग रथासाठी, प्रवासाठी, युद्धासाठी, शर्यतीसाठी आणि धार्मिक यज्ञासाठी केल्याचे उल्लेख प्राप्त होतात. अश्वाला विविध हवामानात जगण्याची कुवत त्याच्या अंगी असल्याने प्राचीन काळापासून स्वतंत्र अस्तित्व प्राप्त झाले आहे[१] पृथ्वीतलावर मनुष्याच्या जीवनाच्या आरंभपूर्वीपासूनच अश्व अस्तित्वात होता इतिहासात मात्र त्याची नोंद इसवी सन पूर्व २ ते ३ हजार वर्षापासूनच उपलब्ध असल्याचे दिसून येते.[२] तसेच मानवाची प्रगती आणि अश्वाचा क्रमिक विकास यांचा परस्पर दृढ संबंध असल्याचे दिसून येते

मानवाच्या जीवनात अश्वाचा प्रवेश नवाश्मयुगापसून झाल्याचे दिसून येते सर्वप्रथम नवाश्मयुगात अश्व हा पाळीव बनला. त्याच्यापूर्वी हजारो वर्षा अगोदरच कुत्रा, शेळी, मेंढी, गाय हे प्राणी मानवाच्या जीवनात प्रवेश केलेला होता.[३] अश्मयुगामध्ये रानघोड्याची शिकार केली जात असे. असे प्राचीन ग्रंथाच्या अभ्यासावरून लक्षात येते.[४]

भारतीय उपखंडात पाळीव घोड्याचा प्रवेश हा विषय अतिशय गुंतागुंतीचा आणि कमालीचा विवादास्पद आहे. याचे एकमेव कारण म्हणजे अश्वाचा संबंध आर्यांच्या आक्रमणाच्या संकल्पनेशी जोडले आहे. सिंधू संस्कृतीत अश्व होते किंवा नाही याबाबत विद्वानांमध्ये अनेक मतभेत आहेत. हे मतभेद जरी बाजूला ठेवले तरी हे स्पष्ट आहे की, वैदिक काळात भारतीय संस्कृतीत घोड्यांना फार महत्त्वाचे स्थान होते.[५]

प्राचीन भारतीय साहित्यात अश्वाचे अनेक उल्लेख आढळून येतात. ऋग्वेदकाळापासून अश्व हा युद्ध, वाहन तथा प्रवासाठी उपयुक्त असल्याचे पुरावे मिळतात. अश्व हा बलवान, वेगवान आणि कोणत्याही हवामानात जगण्याची कुवत त्याच्या अंगी असल्यामुळे वैदिक आर्यांना तो प्रिय होता.

अश्वाच्या उत्पतीविषयी ऋग्वेदात, पुराणात व वाङ्मयात पुढील नोंद आढळून येते.

१) वसु नामक देवांनी अश्वाला सूर्यापासून उत्पन्न केले. वायूने त्याला रथाला जोडले. गंधर्वाने त्याचा लगाम धरला व इन्द्र प्रथम त्यावर आरुढ झाला.[६]

२) "....लोचनीआश्रूपातगळति ते हाते झडिति तेथे जन्मपावति तुरंगम जाती३ वाम लोचनि घोडिजन्मलि दक्षिणलोचनि घोड्याचि उत्पति जालि तेथुन विस्तारूपावलि आश्वाचिजाती४"

शालिहोत्र नामक एका शिवकालीन अश्वशास्त्रामध्ये अश्वांची उत्पत्ती यज्ञ करतेवेळी डोळयातून पडणाऱ्याअश्रू पासून झाल्याची माहिती दिलेली आहे. डाव्या डोळ्यातील अश्रूपासून अश्व व उजव्या डोळ्यातील अश्रूपासून अश्व उत्पन्न झाला असे यज्ञकर्त्या ऋषींचे म्हणणे आहे.[७]

३) भारतीय पुराणामध्ये अश्व ब्रह्मदेवाच्या पायापासून उत्पन्न झाल्याचे संगितले आहे[८]

४) त्रेता आणि द्वापारयुगात अश्वमेध यज्ञांची वर्णने आहेत[९]

५) राम व युधिष्ठिर या राजांनी केलेले अश्वमेध यज्ञ रामायण व महाभारत या हिंदूच्या ग्रंथात प्रसिद्ध आहेत[१०]

६) काही प्राचीन भारतीय ग्रंथामध्ये अश्वाची उत्पत्ती पुढील सात प्रकारात असल्याचे संगितले आहे, "अमृत, बाष्प, अग्नि वेद अंड, गर्भ व साम या सातापासून अश्वांची उत्पत्ती होते"[११]

७) भारताच्या वायव्य सरहद्दीवरील अश्व उत्तम प्रतीचे मानले जातात. ऋग्वेदामध्ये एक युद्धोपयोगी प्राणी म्हणून घोड्यांचे वर्णन आढळतात. वैदिक आर्य युद्धात घोडे जुंपलेले रथ वापरीत[१२]

ऋग्वेदकालीन अश्वांच्या महत्त्वासंबंधी एक नोंद संस्कृतीकोषात दिलेले आहे

ऋग्वेदात कित्येक ठिकाणी घोडदौडीचेही उल्लेख आढळतात. घोडदौडीला ऋग्वेदात 'आजी' म्हटले आहे. त्यावेळी अश्वांच्या शर्यती लावीत व शर्यत जिंकणाऱ्याला पारितोषिकेही देत. इंद्राला अश्वांच्या शर्यतीची आवड असल्याचे त्याला दिलेल्या'आजिकृत' व 'आजिवती' या विशेषणावरुन कळते. वाजपेय, राजसुय इत्यादी यज्ञांच्या प्रसंगी औपचारिक रूपाने घोडदौड करण्याची प्रथा होती. ऋग्वेदकाळी अश्व पाळीव असल्याने त्यांना हवे तसे पालन करून विक्रीस उपलब्ध केले जात होते. त्याची किंमत जास्त असे. घोडा किंवा घोडी यांना त्यावेळी दान योग्य वस्तू म्हणून स्थान दिलेले होते ऋग्वेदातल्या दानवस्तुतीच्या सुक्तात अश्वदानाचे उल्लेख आढळतात. घोड्यापेक्षा घोडी अधिक चपळ असल्याने रथासाठी घोडी अधिक पसंत करीत[१३]

ऋग्वेदकाळात अश्व वापरला जातो याविषयी एक नोंद आढळते ते पुढीलप्रमाणे

"ऋग्वेदकाळी अश्व दुर्मिळ नव्हते वैदिक आर्य युद्धप्रसंगी अश्व जुंपलेले रथ वापरीत हे कळते पण ते घोड्यावर स्वार होत असल्याचे उल्लेख मात्र आढळत नाहीत. युद्धाशिवाय इतर वेळी मात्र घोड्यांच्या स्वारीसाठी उपयोग करीत त्यांच्या पाठीवर ओझेही लादत. अश्व चरायला सोडताना त्याचे पाय बांधण्याची चाल होती. अश्वांची पागा, त्यांचा खुराक, त्यांचे स्नान इत्यादीची व्यवस्था पाहण्यासाठी अश्वपाल नेमीत असत. अश्वांचे लगाम व चाबुक इत्यादी उपकरणांचे वर्णन ऋग्वेदात आढळते"[१४]

वैदिक काळात घोडेस्वारी करणे जरी महत्त्वाचे मानले जाई तरी लढाईच्या संघटनेचा घोडदळ हा एक महत्त्वाचा भाग होता असे ऋग्वेदकाळावरून तरी वाटत नाही. अथर्ववेदात घोड्यांनी उडवलेल्या धुळीचा उल्लेख आहे. परंतु घोडदलाने युद्धात भाग घेतलेला उल्लेख मात्र तिथे निदर्शनास येत नाही.[१५]

ऋग्वेद काळात यज्ञास महत्त्वाचे स्थान होते. यज्ञाचे अनेक प्रकार होते. सोमयाग, अश्वमेध असे दीर्घकालीन चालणारे तसेच दररोज आणि प्रासंगिक यज्ञ असे प्रकार होते. वैदिक काळात सोमयाग यज्ञ पुत्रप्राप्ती, धनसंपदा, पशू-प्राणी यांचे संरक्षण यासाठी प्रार्थना म्हणून यज्ञ करीत असे. पुढील काळात तत्कालीन शासक हाच सोमयाग यज्ञ विश्वविजयाने चक्रवर्तीपद मिळविण्याकरिता करीत असे.[१६]

ऋग्वेदात अनेक देवदेवतांवर सुक्त रचले आहेत त्यापैकी अश्विनीकुमार हे ऋग्वेदातील व्यक्तीद्वयात्मक अशी देवता होय त्यांना वेदांत 'अश्विन' किंवा 'अश्विनौ' अशी संज्ञा प्राप्त आहे. घोड्याचे व घोडीचे असे रूप घेतलेल्या सूर्य आणि संज्ञा यांचे ते जुळे पुत्र होत वडवा (घोडी) ही संज्ञेहून वेगळी होती, असे काहींचे अभिप्राय आहे. 'अश्विन' किंवा 'अश्विनौ' यांचा जन्म नाकातून झाला असल्यामुळे किंवा ते असत्य न बोलणारे असल्यामुळे त्यांना'नासत्य' असेही नाव आहे. एकाचे नाव 'नासत्य' व दुसऱ्याचे नाव 'दस्र' असेही मतप्रवाह आढळून येते. प्राचीन कोशांत किंवा साहित्यात दोन्हीही नावे दोघांना दिलेले आढळतात. त्यांना देवांचे यज्ञ मानले जात त्यांनी विश्वलेपला लोखंडाचा पाय बसविला असल्याचे उल्लेख आढळते. गुरु-शुक्रावरुन किंवा ध्रुव प्रदेशातील नाक्षत्रप्रकाशावरून ही देवता कल्पिली असावी असे आधुनिक अभ्यासकांचे मत आहे[१७]

अश्विनी हे मेष राशीतील व नक्षत्र मालिकेतील पहिले नक्षत्र आहे. या नक्षत्रात नक्षत्र पद्धतीतील आल्फा, बीटा आणि गॅमा हे तीन दिसून येतात. या तीन ताऱ्यांचा मिळून दिसणारा आकार अश्वमुखासारखा दिसत असल्याने त्याला 'अश्विनी' हे नाव पडले असल्याचे दिसून

येते.[१८] काही ठिकाणी याचे दोनच तारे मानले जातात. ऋग्वेदात व इतर संहितात 'अश्वयुजौ' असा द्विवचनी उल्लेख आहे. अश्वरूपी संज्ञानामक सूर्यपत्नीपासून जन्म पावलेल्या अश्विनौ कुमारांच्या कथेशी संबंध जोडला जातो

## निष्कर्ष :

अश्व किंवा घोडयाचे आधुनिक काळात फक्त शर्यती तसेच युद्धात उपयोगात आणण्यासाठी मर्यादित असले तरी प्राचीन काळात तथा जेव्हा मानवी जीवनात घोड्याचा पाळीव प्राणी म्हणून प्रवेश झाला. त्याचे अभ्यास करणे आवश्यक आहे. आज जसे मानवाला वाहन व मोबाइल अति प्रिय आहेत. प्राचीन काळात अश्व हे अन्न, वस्त्र व निवारा प्रमाणे आवश्यक असल्याचे दिसून आल्याने त्यावर प्रकाश टाकणे किंवा अभ्यास करणे महत्त्वाचे होते. अश्वावरील किंवा घोड्यावरील संशोधनलेख विस्तारभयास्तव संशोधक फक्त ऋग्वेदकालीन अश्व यावर लक्षकेंद्रीत केले. ऋग्वेदात अश्वाला फार महत्त्वाचे स्थान असल्याचे दिसून येते. ऋग्वेदात अश्वाचे किंवा घोड्याचे रथ, युद्ध, प्रवास आणि यज्ञाकरिता उपयोगात आणले आहे. विशेषता अश्वाला अश्विनौच्या रूपाने देवताचे स्थान दिल्याचे दिसून येते. त्यांचा जन्म नाकातून झाल्याने तसेच ते कधीही असत्य न बोलणारे असल्याने त्यांना 'नासत्य' म्हटलेले आहे. म्हणजे जसे कधीही हिंसा न करणे यास अहिंसा शब्द अस्तित्त्वात आहे. तसे कधीही असत्य न बोलणारे यास 'नासत्य' शब्द अस्तित्त्वात आहे. ऋग्वेदात या 'नासत्य' च्या रूपाने तत्कालीन हुकूमशाही किंवा जनतेस वेठीस धरून शासन चालविणाऱ्यांना कोणत्याही शस्त्राविना प्रत्युत्तर किंवा प्रतिकार करणे शक्य झाल्याचे दिसून येते.

## संदर्भ :


१. लक्ष्मणशास्त्री जोशी (संपा), मराठी विश्वकोश खंड १, म.रा.सा.सं.मं., मुंबई, १९७६, पृ. ६४७-६४८

२. कित्ता

३. लक्ष्मणशास्त्री जोशी (संपा), मराठी विश्वकोश खंड ५, म.रा.सा.सं.मं., मुंबई, १९७६, पृ. ५८९-५९०

४. कित्ता

५. कित्ता

६. महादेवशास्त्री जोशी (संपा), भारतीय संस्कृती कोश खंड ५, पुणे, १९६२, पृ. २७६

७. महालिंगदास (अनु.), शालिहोत्र, शालिवाहन शके, १५५८, पृ. १

८. महादेवशास्त्री जोशी (संपा), भारतीय संस्कृती कोश खंड ५, पुणे, १९६२, पृ. २७७

९. कित्ता

१०. कित्ता

११. कित्ता, पृ. २९७

१२. लक्ष्मणशास्त्री जोशी (संपा), मराठी विश्वकोश खंड ५, म.रा.सा.सं.मं., मुंबई, १९७६, पृ. ५८९-५९०

१३. महादेवशास्त्री जोशी (संपा), भारतीय संस्कृती कोश खंड ५, पुणे, १९६२, पृ. २७६

१४. कित्ता

१५. लक्ष्मणशास्त्री जोशी (संपा), मराठी विश्वकोश खंड १, म.रा.सा.सं.मं., मुंबई, १९७६, पृ. ६४५-६४९

१६. कित्ता

१७. कित्ता

१८. कित्ता